## अभ्यासिके संदर्भातील सामंजस्य करार

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ (यापुढे विद्यापीठ असा उल्लेख करण्यात येईल) आणि ..........................................................................(यापुढे महाविद्यालय असा उल्लेख करण्यात येईल) दरम्यान दिनांक ...............................................रोजी अभ्यासिका विकसित करण्याबाबत सदर सामंजस्य करार करण्यात आला.

ज्या अर्थी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने दिनांक ३०.०७.२०१६ च्या सभेत बाब क्र. ७८ अन्वये ज्ञान स्त्रोत केंद्राद्वारे विद्यार्थ्यांना अभ्यासाकरीता विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयाच्या सहकार्याने सुसज्ज व सर्व सोयीने युक्त अभ्यासिका/वाचन कक्ष उपलब्ध करून देणे संदर्भात ज्ञान स्त्रोत समितीद्वारे गठीत उपसमितीच्या अहवालास मान्यता प्रदान केली.

ज्या अर्थी विद्यापीठ आणि महाविद्यालय विद्यार्थ्यांच्या सोयीकरीता महाविद्यालयात अभ्यासिका/ वाचन कक्ष विकसित करतांना खाली नमूद जबाबदाऱ्या स्विकारून ती सुचारू पध्दतीने चालविण्यास परस्परांशी सदर करार करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**अ) विद्यापीठाची जबाबदारी**

(i) ज्ञान स्त्रोत केंद्राद्वारे घेण्यात येत असलेल्या ऑनलाइन डाटा बेसेस मधील माहिती रिमोट ॲक्सेस च्या माध्यमातून महाविद्यालयास प्राप्त होण्याची सुविधा प्रदान करणे.

(ii) महाविद्यालयाच्या सहकार्याने संबंधित महाविद्यालयाच्या परिसरात सुरू कार्यात येणाऱ्या अभ्यासिकेच्या कामकाजाचे नियमित परीक्षण करणे.

**ब) महाविद्यालयाची जबाबदारी**

i) इच्छुक विद्यार्थ्यांना त्यांच्या विनंतीनुसार सभासदत्वाकरीता स्टडी रूम कार्ड पुरविण्यात यावेत.

ii) विद्यार्थ्यांकडुन सदस्यत्वाच्या रूपात ज्ञान स्त्रोत केंद्राद्वारे वेळोवेळी ठरविण्यात आलेले शुल्क आकारण्यात यावेत.

iii) १०० ते १५० विद्यार्थी एकाच वेळेस बसू शकतील अशी हवेशीर अभ्यासिका विद्यार्थ्यांना उपलब्ध करून द्यावी त्यासोबत आवश्यक संसाधने (जसे टेबल खुर्ची, लाईट, पंखे इत्यादी) पुरविण्यात यावे.

iv) अभ्यासिकेच्या देखभालीकरीता आवश्यक मनुष्यबळ पुरविणे.

v) अभ्यासिका विद्यार्थ्यांकरीता दिवसातून कमीत कमी १२ तास उघडी राहील ह्याची काळजी घेणे.

vi) अभ्यासिकेत दर्शनी भागात खालील प्रमाणे बॅनर लावण्यात यावे.

**Study Room**
**In collaboration with**
**Sant Gadge Baba Amravati University Knowledge Resource Centre**

vii) अभ्यासिकेच्या शिस्त व कार्यपद्धती बाबत महाविद्यालय जबाबदार राहील.

viii) ज्ञान स्त्रोत केंद्राद्वारे वेळोवेळी निर्गमीत करण्यात येणाऱ्या सुचनांचे पालन करणे

ix) सभासद शुल्काच्या माध्यमातून प्राप्त होणाऱ्या निधीतील ८० टक्के निधी महाविद्यालय तर उर्वरीत २० टक्के हा विद्यापीठास मिळेल.

x) सद्यस्थितीत अभ्यासिकेच्या सभासदत्वाकरीता ५० रु. प्रती महिना शुल्क आकारल्या जाईल.

xi) महाविद्यालय व ज्ञान स्त्रोत केंद्र ह्यांना दोघांनाही करार संपुष्टात आणता येईल. शैक्षणिक वर्षा अखेर म्हणजे ३० जुन रोजीच करार संपुष्टात येईल परंतु त्याकरीता ९० दिवस अगोदर ज्ञान स्त्रोत केंद्रात अर्ज करावा लागेल.

xii) करार संपुष्टात आल्या बरोबर ज्ञान स्त्रोत केंद्राद्वारे मिळणारी सुविधा संपुष्टात आणली जाईल.

अभ्यासिका संदर्भातील सदर सामंजस्य करार दिनांक............................................ पासून अमलात येईल.

| | |
|---|---|
| प्राचार्य<br>(सही व शिक्कासह) | कुलसचिव<br>(सही व शिक्कासह) |